THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 7TH FEBRUARY 1895.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**ज्या दस्तऐवजांअन्वयें कंपन्यांची रचना करण्यांत आलेली असते त्या दस्तऐवजांमध्यें विवक्षित फेरफार करण्यास त्या कंपन्यांस अधिकार देण्यासाठीं आणि सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थीं कंपन्यांची रचना ज्या दस्तऐवजांअन्वयें करण्यांत आलेली असते, त्या दस्तऐवजांतील ठरावांमध्यें विवक्षित प्रसंगीं फेरफार करण्याचा त्या कंपन्यांस अधिकार देणें इष्ट आहे आणि ज्या अर्थीं सन १८८२चा हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट, कलम ६९, ह्यांत सुधारणा करणें हेंही इष्ट आहे, त्या अर्थीं, ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) ह्या आक्टास सन १८९१ चा हिंदुस्थानचा कंपन्यांचा (मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनचा) आक्ट असें ह्मणावें ; आणि — लहान सरनामा व सुरवात.

(२) तो एकदम अमलांत येईल.

२. कलमें ३ ते १० (दोन्ही धरून) हीं, सन १८८२ चा कंपन्यांविषयीं आक्ट ह्यावरोबर वाचावीं, आणि तीं त्या आक्टाचा भाग आहेत असें समजावें. — कलमें ३ व १० हीं सन १८८२ चा आक्ट ६ वा ह्याबरोबर वाचावीं.

३. ह्या आक्टांत, विषयास अगर संदर्भास बाध येत नसेल तर,— — व्याख्या.

(१) "डीड आफ् सेटलमेंट" ह्या संज्ञेंत, सरकतीच्या कोणत्याही कराराचा अगर, पार्लमेंटाचा आक्ट किंवा रॉयल चार्टर किंवा लेटर्स पेटंट नाहीं अशा ज्या दस्तऐवजावरून एकाद्या कंपनीची रचना करण्यांत आली असेल अगर तिचें नियमन झालेलें असेल त्याचा समावेश होतो असें समजावें ; आणि

(२) "कोर्ट" ह्या शब्दाचा अर्थ हाय कोर्ट असा समजावा.

४. ह्या आक्टाच्या ठरावांस पात्र राहून, सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट ह्याखालीं नोंदलेल्या कंपनीस, विशेष ठराव करून, त्या कंपनीच्या मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनच्या ठरावांमध्यें अगर डीड आफ् सेटलमेंटच्या ठरावांमध्यें — कोर्टाच्या मंजुरीस पात्र राहून कंपनीला आपल्या उद्देशांमध्यें अगर रचनेच्या प्रकारामध्यें फेरफार करण्यास अधिकार.

तिच्या उद्देशांसंबंधानें खालीं निर्दिष्ट केलेल्या कारणांपैकीं कोणत्याही कारणासाठीं जरूर असेल तेवढ्यापुरता फेरफार करण्याचा, अगर कंपनीच्या उद्देशांसंबंधानें सदर्हू प्रकारचा कोणताही फेरफार करून अगर केल्याशिवाय, डीड आफ् सेटलमेंटच्या बदला मेमोऱ्यांडम व आर्टिकल्स आफ् असोसिएशन दाखल करून, त्या कंपनीच्या रचनेच्या प्रकारांत फेरफार करण्याचा, अखत्यार आहे ; परंतु कोणत्याही बाबतींत, असा कोणताही फेरफार, अर्जी करण्यांत येऊन कोर्टाकडून मंजूर करण्यांत येई तोंपर्यंत, अमलांत येणार नाहीं.

मंजुरी देण्याच्या आधीं ज्या बाबतींविषयीं कोर्टाची खात्री झाली पाहिजे त्या बाबती.

५. असा कोणताही फेरफार मंजूर करण्याच्या आधीं, कोर्टाची खात्री झाली पाहिजे कीं—

(अ) त्या कंपनीच्या डिबेंचरच्या किंवा डिबेंचर स्टाकच्या प्रत्येक धारण करणारास आणि कोर्टाच्या मतें त्या फेरफाराच्या योगानें ज्या कोणत्याही मनुष्याच्या किंवा ज्या कोणत्याही वर्गाच्या मनुष्यांच्या हितसंबंधास बाध येईल त्या प्रत्येक मनुष्यास अगर त्या दरेक वर्गाच्या मनुष्यांस योग्य मुदतीची नोटीस दिलेली आहे, आणि

(ब) कोर्टाच्या मतें हरकत घेण्यास ज्यास हक्क असून कोर्टानें फर्माविलेल्या रीतीनें ज्यानें आपली हरकत दाखल केली असेल अशा प्रत्येक धनकोच्या बाबतींत, असे फेरफार करण्याकरितां त्याची संमति घेतलेली आहे अगर त्याचें कर्ज अगर दावा देऊन टाकिला आहे अगर निःशेष झाला आहे अगर त्याबद्दल कोर्टाची खात्री होईल अशा रीतीनें तारण घेतलेलें आहे.

मात्र असें ठरविलें आहे कीं, विशेष कारणासाठीं, कोणत्याही मनुष्याच्या अगर कोणत्याही वर्गाच्या मनुष्यांच्या बाबतींत, ह्या कलमांत सांगितलेली नोटीस दिलेली नसली तरी चालेल असें ठरविण्याचा कोर्टास अधिकार आहे.

मंजूर करितांना कोर्टास अटी घालून देण्याचा आणि खर्चासंबंधानें हुकूम करण्याचा अधिकार आहे.

६. सदर्हू प्रकारचा कोणताही फेरफार मंजूर करण्याचा हुकूम, कोर्टास योग्य वाटतील त्या अटींवर व तशा शर्ती लागू करून करण्याचा अधिकार आहे, आणि कोर्टास आपल्यास योग्य वाटतील ते खर्चासंबंधाचे हुकूम करण्याचा अखत्यार आहे.

कोर्टास दिलेला अखत्यार.

७. कोर्ट ह्या आक्टाअन्वयें आपला अखत्यार चालवीत असतांना त्यानें कंपनीच्या मेंबरांच्या किंवा त्या मेंबरांपैकीं कोणत्याही वर्गाच्या मेंबरांच्या व त्याचप्रमाणें त्या कंपनीच्या धनकोंच्या हक्काकडे व हिताहिताकडे लक्ष पुरविलें पाहिजे, आणि विरुद्ध मताच्या मेंबरांचा हितसंबंध विकतघेण्यासाठीं कोर्टास योग्य वाटेल अशी व्यवस्था करण्याकरितां, कोर्टास, योग्य वाटल्यास, आपणापुढें चाललेलें काम तहकूब ठेवण्याचा अखत्यार आहे; आणि अशी कोणतीही व्यवस्था करण्याचें काम सुलभ करण्यासाठीं अगर अशी कोणतीही व्यवस्था अमलांत आणण्यासाठीं आपल्यास योग्य वाटतील त्या सूचना अगर हुकूम करण्याचा त्या कोर्टास अखत्यार आहे:

मात्र, कंपनीच्या भांडवलाचा कोणताही भाग, सदर्हू प्रकारचा हितसंबंध खरेदी करण्याच्या कामीं खरचणें कधींही कायदेशीर होणार नाहीं.

करावयाचा फेरफार ज्या कारणांवरून कोर्टास मंजूर करितां येईल तीं कारणें.

८. जर कोर्टास असें दिसून येईल कीं, कंपनीला,

(अ) तिचें काम जास्त काटकसरीनें अगर जास्त चांगल्या रीतीनें चालविण्यासाठीं, अगर,

(च) तिचा मुख्य उद्देश नव्या किंवा सुधारलेल्या साधनांनीं सिद्धीस नेण्यासाठीं, अगर,

(क) तिचा काम करण्याचा प्रदेश वाढविण्यासाठीं किंवा बदलण्यासाठीं, अगर,

(ड) जें कोणतेंही काम अगर जीं कोणतींही कामें विद्यमान स्थितिपरत्वें सोईनें किंवा कायदेशीर रीतीनें तिच्या कामांत सामील करतां येण्यासारखीं असतील तें काम अगर तीं कामें करण्यासाठीं, अगर,

(इ) मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनमध्यें किंवा डीड आफ् सेटलमेंटमध्यें दाखल केलेले कोणतेही उद्देश मर्यादित करण्यासाठीं अगर सोडून देण्यासाठीं,

तिच्या उद्देशांत सदर्हू प्रकारचा कोणताही फेरफार करणें जरूर आहे, तर, त्या कोर्टास, तसा कोणताही फेरफार पूर्णपणें अगर अंशतः मंजूर करण्याचा अधिकार आहे.

फेरफार केलेला मेमोऱ्यांडम, अगर नवीन दाखल केलेला मेमोऱ्यांडम व आर्टिकल्स, यांसह हुकूम नोंदणें व त्याप्रमाणें नोंदल्याचा परिणाम.

९. (१) जर एखाद्या कंपनीनें, आपल्या मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशन अगर डीड आफ् सेटलमेंट याच्या ठरावांमध्यें त्या कंपनीच्या उद्देशांच्या संबंधानें फेरफार केला असेल, अगर डीड आफ् सेटलमेंटच्या बदला मेमोऱ्यांडम व आर्टिकल्स आफ् असोसिएशन दाखल करून आपल्या रचनेच्या प्रकारांत फेरफार केला असेल आणि असा फेरफार कोर्टानें मंजूर केला असेल, तर, तो फेरफार कोर्टाच्या ज्या हुकुमांत मंजूर केलेला असेल त्या हुकुमाची दफ्तरांत ठेवावयाची नकल, प्रसंगाप्रमाणें, सदर्हूप्रमाणें फेरफार केलेल्या मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनच्या अगर डीड आफ् सेटलमेंटच्या एका छापील प्रतीसह अगर डीड आफ् सेटलमेंटच्या बदला दाखल केलेल्या मेमोऱ्यांडम व आर्टिकल्स आफ् असोसिएशनच्या एका छापील प्रतीसह, त्या हुकुमाच्या तारिखेपासून पंधरा दिवसांच्या आंत, जाइंट स्टाक कंपन्यांच्या रेजिस्ट्राराकडे त्या कंपनीनें दिली पाहिजे, आणि त्या रेजिस्ट्रारानें त्या नोंदून, त्या नोंदल्याबद्दल त्यांवर आपल्या सहीचा दाखला लिहिला पाहिजे; आणि तो त्यानें लिहिलेला दाखला त्या फेरफारांसंबंधाचे व तो फेरफार मंजूर करण्याच्या संबंधाचे ह्या आक्टांतले सर्व हुकूम पाळण्यांत आले असल्याबद्दल, निरुत्तर पुरावा समजला जाईल.

(२) सदर्हूप्रमाणें नोंदल्याच्या तारिखेपासून, (परंतु ह्या आक्टाचे ठराव लागू राहून), प्रसंगाप्रमाणें, सदर्हूप्रमाणें फेरफार केलेलें मेमोऱ्यांडम अगर डीड आफ् सेटलमेंट हें त्या कंपनीचें मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशन अगर डीड आफ् सेटलमेंट होईल असें समजावें, अगर, सदर्हू प्रकारचें दाखल केलेलें मेमोऱ्यांडम व आर्टिकल्स आफ् असोसिएशन हें, ती कंपनी सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्याविषयीं आक्ट ह्याच्या १ ल्या भागाअन्वयें त्या मेमोऱ्यांडम व आर्टिकल्स आफ् असोसिएशनसह नोंदलेली कंपनी असल्याप्रमाणेंच, त्या कंपनीस लागू होईल, आणि त्या तारिखेपासून त्या कंपनीचें डीड आफ् सेटलमेंट त्या कंपनीस लागू असणार नाहीं.

तीन महिन्यांच्या आंत न नोंदल्याचा परिणाम.

१०. सदर्हू प्रकारचा कोणताही फेरफार गेल्या शेवटच्या कलमाअन्वयें योग्य रीतीनें नोंदला जाईपर्यंत मुळींच अमलांत येणार नाहीं; आणि तो फेरफार कोर्टाच्या ज्या हुकुमांत मंजूर केलेला असेल त्या हुकुमाच्या तारिखेनंतर तीन महिन्यांच्या आंत तो सदर्हू प्रमाणें नोंदण्यांत आला नाहीं तर, तो फेरफार, तो हुकुम, आणि त्या संबंधाचें चालविलेलें सर्व काम हीं, सदर्हू तीन महिन्यांची मुदत संपतांच पूर्णपणें रद्दबातल होतील व होतात असें समजावें.

सन १८८२ चा आक्ट ६ वा. कलम ६५, याची सुधारणा.

११. सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट, कलम ६५, ह्यांत, "सदर्हू प्रकारच्या भाषेंत किंवा भाषात" हे शब्द दुसऱ्यानदां आले आहेत त्यांच्या ऐवजीं "इंग्रजी भाषेंत" हे शब्द दाखल करावे.

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

सन १८९० चा कंपन्यांचा (मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनचा) आक्ट (५३ व ५४ व्हिक्टोरिआ, चाप्टर ६२) ह्यांतील ठराव हिंदुस्थानांतील कंपन्यांस लागू करण्यासाठीं हा मसुदा सादर केला आहे. त्या आक्टांत, कंपन्यांबाबदच्या आक्टांअन्वयें नोंदलेल्या कोणत्याही कंपनीस, तिच्या मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनमध्यें निर्दिष्ट केलेल्या तिच्या उद्देशांत, विवक्षित मर्यादेच्या आंत व कोर्टाच्या मंजुरीनें फेरफार करण्याचा अधिकार दिलेला आहे. ज्या कंपन्यांची रचना अगर संस्थापना सदर्हू प्रकारें कायदेशीर रीतीनें करण्यांत आलेली आहे, त्यांच्या बाबतींत, त्यांच्या डीड आफ् सेटलमेंटच्या बदला मेमोऱ्यांडम व आर्टिकल्स आफ् असोसिएशन दाखल करण्याचा अधिकारही त्याच आक्टांत दिलेला आहे. हल्लीं आमच्या कंपनीच्या आक्टाअन्वयें (सन १८८२ चा आक्ट ६ वा ह्याअन्वयें) नोंदलेल्या कोणत्याही कंपनीस, त्या आक्टाच्या १२ व्या कलमांत सांगितलेल्या अत्यंत संकुचित मर्यादेपर्यंत मात्र आपल्या मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनमध्यें फेरफार करितां येतो. तिला जर आपले उद्देश जास्त विस्तृत करावयाचे असले किंवा त्यांत कांहीं फेरफार करावयाचा असला, तर, तसें करणें कितीही वाजवी असलें तरी, हल्लीं, कंपनी मोडून पुनः उभी करण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाहीं. तसेंच, वर उल्लेख केलेल्या विलायतेच्या कायद्याच्या दुसऱ्या भागासारखे ठराव हिंदुस्थानच्या कायद्यांत नाहींत.

२. सदर्हू दोन्ही बाबतींमध्यें हिंदुस्थानांतील कंपन्यांस विलायतेंतल्या कंपन्यांच्या बरोबरीच्या पायावर आणून ठेवावें हें इष्ट वाटल्यावरून हा मसुदा तयार केला आहे. ह्या मसुद्यांत सदर्हू विलायतेच्या कायद्यांतले ठराव केवळ उतरून घेतले आहेत; परंतु त्यांमध्यें एवढाच फेरफार केला आहे कीं, विवक्षित दस्तऐवज त्या कायद्यांतल्या ठरावांबरहुकूम नोंदण्यांत आले नाहींत तर अशा कसूरीच्या दरेक दिवसाबद्दल त्या कायद्यांत जो दाहा पौंडांचा दंडाचा ठराव आहे त्याच्या ऐवजीं, ह्या मसुद्यांत सांगितलेला कोणताही फेरफार योग्य रीतीनें नोंदला नाहीं तर तो अमलांत येणार नाहीं, असा आणि तो फेरफार कोर्टाच्या ज्या हुकुमांत मंजूर केला असेल त्या तारिखेपासून तीन महिन्यांच्या आंत जर सदर्हू रीतीनें नोंदला नाहीं तर, तो फेरफार आणि त्या संबंधाचें चालविलेलें सर्व काम रद्दबातल होईल असा, ठराव दाखल केला आहे.

३. ही संधि साधून, मूळ आक्टाच्या ६१ व्या कलमांत एक सुधारणा करण्याकरितां एक ठराव ह्या मसुद्यांत दाखल केला आहे. त्या कलमांत हल्लीं असा एक ठराव आहे कीं, कोणत्याही कंपनीकडून किंवा तिच्या वतीनें जे कोणतेही दस्तऐवज प्रसिद्ध करण्यांत येतील किंवा सही करण्यांत येतील, त्या दस्तऐवजांमध्यें त्या कंपनीचें नांव इंग्रजी व देशी अशा दोन भाषांत दाखल केलेलें असावें. असें करण्याची आतां जरूरी राहिलेली नाहीं ह्मणून, ह्यापुढें सदर्हू प्रकारच्या दस्तऐवजांमध्यें कंपनीचें नांव इंग्रजींत मात्र दाखल केलेलें असावें असें, ह्या मसुद्याच्या ११ व्या कलमावरून ठरविण्याचा इरादा आहे.

तारीख ९ माहे जानेवारी सन १८९५

(सही) जे. वेस्टलंड.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.